
ज्ञान प्रबोधिनी प्रशाला ५१

# 51@51

आम्ही ५१!



## गोष्ट क्र. ३८

संजीव (संजय) गोखले
(१९६९–१९७४)

दि. १९ सप्टेंबर २०२१

खरंतर माझी गोष्ट मी ‘स्वांत सुखाय’ सांगत आहे असं म्हणेन. त्यामुळे मी नवीन कार्यकर्त्यांसमोर काही सांगणे इष्ट नाही असे मला वाटते. मात्र एक गोष्ट मी आवर्जून सांगेन, की नवीन कार्यकर्त्यांची आव्हाने खूप अवघड आहेत. प्रथम प्रतिज्ञित वा तृतीय प्रतिज्ञित कार्यकर्ता असो, समाजातील प्रलोभनांवर मात करून समर्पित वृत्तीने काम करणे हे आजच्या काळात आव्हानात्मक आहे ! इंटरनेटच्या युगात घरातली माणसे एकमेकांपासून दुरावली जात असताना समाजाला जोडणे हे काम नक्कीच अवघड आहे. अमर्यादित मनोरंजनाची साधने आणि पूर्वीच्या तुलनेत आर्थिक स्वावलंबनाची कठीण आव्हाने असताना देखील तरुण वयात प्रबोधिनीसाठी काम करावेसे वाटणे हाच आत्ताच्या कार्यकर्त्यांचा चांगुलपणा आहे. भरपूर पैसा मिळवावा हे आकर्षण वाटणे साहजिक आहे तरीही समर्पित वृत्तीने काम करत राहण्याच्या आव्हानाला कसे सामोरे जायचे हे तुमचे तुम्हालाच शोधावे लागणार आहे. प्रबोधिनी सारख्या संस्थेशी जोडले जाणे हा एक भाग्याचा विषय असतो. प्रत्येक यशाचे मोजमाप केवळ पैशांमध्ये करता येत नाही. मी आयुष्यामध्ये काही तरी समाजासाठी उपयुक्त काम केले ही भावना अधिक महत्त्वाची असते.  हे आपल्याला प्रबोधिनीत शिकायला मिळते. ते संस्कार आपण प्रामाणिकपणे आयुष्यभर जोपासायला हवेत!

## पेरणी व मशागत



प्रबोधिनीची प्रशाला सुरू झाली ती न्यू इंग्लिश स्कूलमध्ये. दोन शिफ्टमध्ये सकाळ-संध्याकाळ चालणारी आणि वर्गात फक्त दहा मुलं असणारी आणि स्वतःची वास्तू नसलेली अशी शाळा म्हणजे आमची प्रबोधिनी प्रशाला! माझे बालवर्गाचे शिक्षण नगरला झाले. दुसरीपासून भावे स्कूल, पुणे व सातवीमध्ये प्रबोधिनी प्रशालेमध्ये प्रवेश घेतला. संध्याकाळी ५ ते ७ खेळ व त्यानंतर पुन्हा अभ्यासाचे तास. शाळेतील उत्तम शिक्षकांच्या बरोबरीने सहवास आणि मार्गदर्शन मिळत गेले ते मैदानावरील युवक कार्यकर्त्यांचे. ते आमचे मार्गदर्शक तर होतेच पण तरुण मित्रही. आमच्यापेक्षा मोठे पण शाळेतील शिक्षकांपेक्षा वयाने लहान अशा या युवक कार्यकर्त्यांच्या मधल्या फळीने मला व अनेकांना घडविले. शरदराव सुंकर, विसूभाऊ गुर्जर, शिवराज गोर्ले अशी ही सर्व पिढी. मागील एका लेखात भाई फडके यांच्याबद्दलच्या आठवणी होत्या. पण या मधल्या पिढीतील कार्यकर्त्यांबद्दल अजून बरेच सांगता येईल.

एका बाजूला युवक कार्यकर्त्यांचा हा संच त्यांच्या कॉलेजमध्ये अभ्यास व करियर यामध्ये अव्वल होताच पण प्रबोधिनीतील त्यांचे योगदान तितकेच जोमदार होते. क्रीडांगणावर जिम्नॅस्टिक्स व सहजपणे सूर मारणे (dive) जसे शिकवले तसेच वेळ आली तर रस्त्यावरच्या गुंडांशी दोन हात करून, नाठाळांना सरळ वठणीवर कसे आणायचे, याचेही धडे आम्हाला मिळाले. एकदा वर्गात नेहमीचे शिक्षक येऊ न शकल्याने शिवराज गोर्ले तास घ्यायला आला. एक भन्नाट गोष्ट रंगवून सांगायला लागला. तो कथाकथनाचा एक उत्तम नमुनाच होता. शाळेची वेळ संपून गेली तरी कथाकथन चालूच होते, आम्ही सर्वजण अक्षरशः जागेवर खिळून गेलो. संध्याकाळी सुरू झालेली गोष्ट सलग दोन तास रंगली होती. शिवराजच्या त्या कथाकथनाने घड्याळाचे काटे रात्रीच्या नऊकडे कधी सरकले हेही कळले नाही. जवळपासचे पालक 'मुले अजून का आली नाहीत?' हे बघायला आले, तेही वर्गाच्या आत-बाहेर गोष्ट ऐकण्यात रंगून गेले! माझ्या आयुष्यात मी ऐकलेली 'ओ हेनरी'ची ती पहिलीच कथा होती! या फळीतले काहीजण नंतर आयुष्यभराचे जिवाभावाचे मित्र झाले. शरदराव सुंकर व अनंतराव अभंग यांनी मला वाढदिवसाला एक पुस्तक भेट दिले होते. Sir Norman Vincent Peale यांचे The Power of Positive Thinking हे ते पुस्तक! नंतर असे लक्षात आले की अनेकांना ३०-३५ वर्षांपर्यंत माहितीही नसलेली पॉझिटिव्ह थिंकिंग व त्याची शक्ती ही संकल्पना सांगणाऱ्या पुस्तकाची आम्हाला ओळख इयत्ता आठवीतच झाली!

माझ्यातील वक्तृत्व कौशल्याचा उपजत गुण अशोकरावांनी हेरला. वर्गात एकदा कथाकथनाची स्पर्धा होती व मी त्यामध्ये ऊस्फूर्त नाट्य कथाकथन केले. ते पाहून अशोकरावांनी माझ्याकडून विवेकानंद जयंतीच्या एका कार्यक्रमासाठी विवेकानंदांच्या भाषणाचा एक मोठा उतारा पाठ करवून घेतला. कार्यक्रमाला अध्यक्ष होते प्रसिद्ध लेखक व वक्ते प्रा. शिवाजीराव भोसले! कार्यक्रमानंतर सर्वांनी माझे भरपूर कौतुक केले पण खरे श्रेय होते अशोकरावांचेच.

वक्तृत्वातील आणखी एक गंमतीदार आठवण म्हणजे सैन्यातील एका वरिष्ठ अधिकाऱ्याचे भाषण प्रबोधिनीमध्ये होते. त्यांचा परिचय करून देण्याचे काम माझ्याकडे होते. त्याची तयारी शरदरावांनी करून घेतली. त्यांचा परिचय करून देताना Infantry चा उच्चार मी Elephantry असा करत होतो. सराव करून रंगीत तालमीत ही चूक सुधारलीही पण ऐन कार्यक्रमात पुन्हा Elephantry असाच उच्चार झाला. मागे वळून कावराबावरा होऊन पाहुण्यांकडे बघितले तर ते मिश्किलपणे हसत होते. कार्यक्रमानंतर चहापानाच्या वेळेस सर्व पाहुण्यांबरोबर मा. आप्पांनी मलाही सहभागी केले होते. माझ्यासारख्या विद्यार्थ्याला चूक झाली तरी असा सन्मान मिळणे हे भाग्यच होते. असे विविध अनुभव प्रबोधिनीत मिळत होते.

## अनुभवातून व सहवासातून शिक्षण



त्यावेळच्या युवक कार्यकर्त्यांबरोबरच्या सहवासातून व Exposures मधून मिळालेल्या संधीचा उत्तम उपयोग करण्याचे व आलेल्या परिस्थितीला तोंड देण्याचे शिक्षण मिळत गेले. इ. ९वी किंवा १०वीत असताना बडोद्याला भारतभरच्या सर्व राज्यांमधून आलेल्या शालेय विद्यार्थ्यांचा एक सेमिनार होता. प्रबोधिनीतून मी, अविनाश धर्माधिकारी व संजय सावंत असे तिघेजण गेलो होतो. **अनंतराव अभंग** आमचे मार्गदर्शक होते. त्या सेमिनारमध्ये आम्ही प्रबोधिनीचे वेगळेपण काय, म्हणून एका

सकाळी प्रबोधिनीची उपासना, गायत्री मंत्र व त्याचा अर्थ सांगितला. सेमिनार संपल्यावर अहमदाबादला जाऊन एका प्रसिद्ध उद्योगपतींना भेटायचे व प्रबोधिनीची माहिती सांगायची, हे काम मा. आप्पांनी आमच्या गटावर सोपवले होते. अहमदाबादला सर्वजण प्रथमच जात होतो. स्टेशनवर दुपारी पोचलो. चौकशी केल्यावर कळले की भेटीची जागा साधारण तासभर अंतरावर होती व आमच्याकडे तेथे जाण्यासाठी जेमतेम अर्धा-पाऊण तासच वेळ होता! अनंतरावांनी सांगून टाकले, की आपण आता वेगाने पळत जाणार आहोत! तुम्ही माझ्या मागोमाग यायचे! ते लांबलांब ढांगा टाकत पळत सुटले व आम्ही तिघे त्यांना दृष्टिआड न करता त्यांच्या मागे पळत सुटलो. असे करत अहमदाबादच्या रस्त्यांवरून सुमोर अर्धातास पळण्याचा व्यायाम झाला. अर्थातच भेटीची वेळ चुकली नाही. भेट उत्तम पार पडली. Don't prepare the road for your boys, prepare them for the road हा आयुष्यभर पुरणारा संदेश अनंतरावांनी छोट्या प्रात्यक्षिकातून आमच्यापर्यंत पोचवला!

प्रबोधिनीत शिकलेल्या - समजलेल्या - अनुभवलेल्या अनेक प्रसंगांचे अन्वयार्थ भावी आयुष्यात हळूहळू उलगडत गेले. प्रबोधिनीत मा. आप्पांना व अनेकांना उपासना म्हणताना ऐकत होतो. 'परब्रह्म शक्ती स्फुरो हिंदुत्वामध्ये, परब्रह्म शक्ती स्फुरो प्रबोधिनीमध्ये' असे आर्तपणे म्हणताना ऐकले होते. एकीकडे हे बघून काही प्रश्नही पडायचे. त्यावेळेस कधी-कधी वाटायचे की असे मंत्र म्हणून खरेच अशी शक्ती स्फुरणार आहे का? अवतरणार आहे का? असे म्हणून काही स्फुरते का? पुढे २५-३० वर्षांनी अनेक भारतीय व परदेशी तज्ज्ञांनी याबद्दलचे केलेले विपुल लेखन वाचले. Power of prayers, Healing by prayers, The hidden power of Subconscious mind अशा अनेक लेखनात हीच मांडणी होती. प्रबोधिनीमध्ये म्हणत असलेली उपासना केवळ पोपटपंची नव्हती तर अविरत राष्ट्रकार्य करण्याच्या शुभसंकल्पांना दिलेली उपासनेची व प्रार्थनेची शास्त्रीय जोड होती.

**महाविद्यालयीन शिक्षण व त्यानंतर नोकरी**

प्रशालेत असताना मा. आप्पा काहींना आवर्जून कॉमर्सला जा असं सांगायचे. मलाही सांगितलं. माझं गणित कच्चं व सायन्सची आवड नव्हती म्हणून पडत्या फळाची आज्ञा घेतली. नववी-दहावी-अकरावी कॉमर्स करून कॉलेजमध्ये थेट पहिल्या वर्षात प्रवेश मिळायचा. त्यामुळे पदवी चार वर्षांऐवजी तीन वर्षात हा मोठा फायदा होता. आमच्या वर्गातील नितीन राजहंसच्या वडिलांचा मोठा टाईप फौंड्रिचा व्यवसाय होता. त्यामुळे तोही कॉमर्सला आला व आमची जोडी जमली. ती मैत्री ही आयुष्यभराची झाली. आमच्या आधी कॉमर्सला मोहनराव, प्रफुल्ल ही मंडळी होती. आम्हाला शिकवायला सी. एच. जोशी सर येत होते. ते स्वतः सीए होते. मॉर्डन कॉलेजमधून गोसावी सर शिकवायला यायचे. या शिक्षकांनी आमचा कॉमर्सचा पाया इतका पक्का केला की मला तो आयुष्यभरासाठी पुरला.

प्रशालेतून उत्तीर्ण झाल्यावर कॉमर्स या विषयात मी पदवी परीक्षा पूर्ण केली. बीकॉमची परीक्षा ज्या संध्याकाळी सहा वाजता संपली त्याच्या दुसऱ्याच दिवशी सकाळी साडेदहा वाजता मी नोकरीवर हजर होतो. मी चोवीस तास सुद्धा बेकार राहिलो नाही. बीकॉम करत असताना बँकेची जाहिरात बघून अर्ज केला होता. लेखी-तोंडी परीक्षा पास होऊन क्लार्क म्हणून युनायटेड वेस्टर्न बँकेमध्ये मी कामाला सुरुवात केली. नंतर ही बँक IDBI मध्ये विलीन झाली. कालांतराने माझी पदोन्नती झाली. अधिकारी झाल्यापासून सुमारे आठ-दहा बदल्या व सहा-सात नवीन गावे मी पाहिली.

नोकरीच्या सुरुवातीच्या काळात (म्हणजे १९८०च्या सुमारास) बँकेत कामगार संघटनांचा बोलबाला होता. गेटमीटिंग करणे, घोषणाबाजी, मोर्चे असे वातावरण नेहमीचेच होते. बँकेच्या दरवाजासमोर एकत्र जमून घोषणा देत व्यवस्थापकांना त्यांच्या केबिनमध्ये घेराव घालून निवेदन देणे असा कार्यक्रम असे. त्यात माझाही अर्थात सहभाग होताच. वयाने मी सर्वात लहान व अनुभवाने नोकरीत नवखा. एकदा अशाच एका आंदोलनाच्या वेळेस आमच्या पुढाऱ्याने सांगितले की केबिनमध्ये निवेदन व भाषण तुला करायचे आहे. ऊत्स्फूर्त वक्तृत्वाचे इयत्ता सातवीपासून गिरवलेले धडे त्याक्षणी कामाला आले! ट्रेड युनियनच्या परिभाषेत माझा त्या दिवशी जोरदार परफॉर्मन्स झाला. आपसूकच स्थानिक नेतृत्वाची जबाबदारी त्यानंतर माझ्याकडे चालून आली.

**बारा गावचे पाणी – व्यक्ती तितक्या प्रवृत्ती**

सार्वजनिक क्षेत्रातील बँकेमध्ये कामाचा अविभाज्य घटक म्हणजे बदली. संपूर्ण नोकरीच्या काळात दहा बदल्या व मुक्कामाची सात शहरे अनुभवली. बडोदा, अहमदाबाद, हैद्राबाद, औरंगाबाद अशा शहरांत कामामुळे राहणे झाले. माझ्या या बदल्यांना मी गंमतीने एका '–बाद' कडून दुसऱ्या '–बाद' कडे प्रवास असे म्हणायचो. महाराष्ट्राबाहेरच्या या काही गावांमध्ये मोठ्या संख्येने मराठी भाषिकांची वस्ती व त्यामुळे मराठी सांस्कृतिक वातावरण होते. अहमदाबाद–हैद्राबादला तेथील मराठी मंडळांचेही जोरदार काम होते. त्यांची समृद्ध ग्रंथालयेही आहेत. माझी वाचनाची आवड जोपासण्याला या ग्रंथालयांमुळे खूप मदत झाली. याच वाचनप्रेमामुळे नवीन परिचय होत गेले. हैद्राबादमध्ये आकाशवाणीवर 'माझे वाचन – माझे चिंतन' या विषयावर माझे एक व्याख्यानही झाले. तेथील महाराष्ट्र मंडळात गिरीशराव बापट यांचाही एक कार्यक्रम झाला होता, त्यावेळेस मुक्कामास एक दिवस ते माझ्या घरी आले होते. अहमदाबादला असताना 'गुजराथ समाचार' हे वृत्तपत्र मी आवर्जून वाचायचो, त्यातून गुजराती भाषेचा परिचय वाढला.

वेगवेगळ्या प्रदेशात वेगळे वाचन, खाद्य संस्कृती असते. तशी बँकिंग संस्कृती देखील वेगळी असते. पुण्यात आमच्यावर नियमाप्रमाणे, जागरूकतेने काम करण्याचे संस्कार झाले होते. धंदा व पैसा अंगात भिनलेले गुजराथ राज्य व त्यातही अहमदाबाद शहर म्हणजे अर्क. अहमदाबादमधे नवीन असताना मी चेक पास करायला बसायचो. कॅश काढण्यासाठी दिलेल्या चेकवर मागे सही नसल्यास मी माझ्या टेबलावरून जरा रागावूनच ओरडून चेक घेऊन आलेल्या माणसाला सांगायचो – 'अरे चेक के पीछे साईन करो ना?' तर तो पैसे काढायला आलेला मुनीम वा नोकर तितक्याचा जोरात, न लाजता, न बिचकता विचारायचा की 'साब किसकी साईन करू? मेरी की सेठकी?' आपल्याला उगीच वाटते की उदारीकरणाची सुरुवात नरसिंहराव व मनमोहनसिंगांनी केली – खरे तर गुजराथमध्ये आधीच उदारीकरण सुरू झाले होते! जॉईंट अकौंट उघडायला आलेला प्रवीणभाई माझ्या समोरच त्याची व हंसाबेनची सही फॉर्मवर करायचा व 'यहाँ तो हमेशा ऐसाही करते है' असेही सांगून जायचा. गुजराथमध्ये सर्वाधिक सहकारी बँका बुडल्या ते या अशा प्रवृत्तीमुळे.


मी बँकेत काम करताना जसा नियम पाळण्यासाठी आग्रही असायचो तसा अपवादाने नियमापलीकडे कधी जायचे, टेबलच्या समोर बसलेल्या अडलेल्या ग्राहकाचे काम कसे करायचे हा विचारही करायचो. माझी बँकिंगमधील मोठी कारकीर्द फॉरेक्समध्ये म्हणजे विदेश विनिमय विभागात गेली.

सन २००४ च्या सुमारास घडलेला प्रसंग. बारामतीहून एक बाई आपल्या तरुण मुलाला घेऊन आल्या होत्या. मुलगा परदेशी शिक्षणाला चालला होता. त्यांना विदेशी चलन हवं होतं. मुलाच्या नावाने शैक्षणिक कर्ज मंजूर झाले होते. परदेशी विद्यापीठाने ॲडमिशन दिली होती. असं चलन द्यायच्या आधी आम्ही बँकर व्हिसा मिळाला की नाही हे बघायचो. व्हिसा त्याला मिळाला नव्हता त्यामुळे कुठल्याही बँकेने त्याला परदेशी चलन दिलं नव्हत. ती कौन्सुलेट चलन असल्याशिवाय व्हिसा द्यायची नाही व व्हिसा असल्याशिवाय बँका चलन द्यायच्या नाहीत. हा तिढा सुटायचा कसा? मी कौन्सुलेटच्या अधिकाऱ्यांशी बोललो, व त्याला परिस्थितीतून मार्ग काढायची विनंती केली. कौन्सुलेटला मी लोन सँक्शनचे पत्र दिले व व्हिसा मिळाला तर आम्ही चलन देऊ अशी हमी दिली. त्या मुलाचे काम झाले. नियमानुसार त्याचे काम होऊ शकणार नाही असं सांगून मोकळे होणे सोपे होते. पण तसं न करता थोडा जास्त पुढाकार घेऊन हालचाल केल्याने काम झाले. माझ्या हाताखालच्या सर्वांना मी आर्वजून सांगायचो की तुमच्याकडे येणारा व्यापारी, उद्योजक, सामान्य ग्राहकाला इतर असंख्य गोष्टींचं भान ठेवायचे असते. त्याच्यापुढे विविध आघाड्यांवरची आवाहनं असतात त्यातले एक बँकिंग/वित्त असतं याचं भान ठेवून आपण त्याचा प्रश्न सोडवला पाहिजे.



**काही प्रशिक्षणे**









**दुबई येथील वास्तव्य**



२००७ ला आमच्या बँकेचे, युनायटेड वेस्टर्नचे विलिनीकरण आय.डी.बी.आय. बँकेत झाले. अशा विलिनीकरण झालेल्या बँकेच्या कर्मचाऱ्यांचे मनोबल थोडेसे खाली आलेले असते आणि एक प्रकारचा तणाव असतो. त्यांच्याकडे बघण्याचा दृष्टिकोनही कधी-कधी चांगला नसतो. पण आपल्या ज्ञानावर आणि कामावर विश्वास असणारे अशाही परिस्थितीत टिकतात, स्थिरावतात, स्वःताचा प्रभाव पाडतात. काही कर्मचाऱ्यांनी Exit Window मधून बाहेरचा रस्ता पत्करला. मी नेहमी म्हणायचो की विलिनीकरण वर्ल्ड बँकेत झाले तरी पाय रोवून उभे राहू व टिकूयात! आम्ही आमची उपयुक्तता सिद्ध केली व आमच्या ज्ञानावर टिकून राहिलो. आमच्यापैकी काही लोकांना आयडीबीआयने वरच्या प्रमोशनसाठी सर्वप्रथम संधी दिली. त्यामध्ये ज्यांना डिजीएमचे प्रमोशन मिळाले त्या मोजक्या लोकांमध्ये माझा समावेश होता. मी ऑडिट विभागामध्ये जवळ-जवळ सात-आठ वर्षं काम केले. मी बँकेच्या साधारण पन्नास फॉरेक्स ब्रांचेसच्या ऑडिटच्या प्रमुखपदाची जबाबदारी पार पाडली. बँकेची परदेशात-दुबईला एकमेव शाखा होती. त्याच्या ऑडिटची मी एक वर्ष जबाबदारी सांभाळली.

माझी जवळ-जवळ ३० वर्षं फॉरेक्समधे विविध पदांवर काम करण्यात गेली. इथे काम करण्यात आव्हाने व त्रास होता. पण याच कामामुळे मला तुलनात्मकरित्या लवकर बढत्या मिळाल्या. फॉरेक्समधे काम करणाऱ्यांना एक वलय असतं ते वलयही अनुभवायला मिळाले. दूरदूरच्या शहरात काम करण्याची संधी मिळाली व आयुष्य समृद्ध झाले. याच कामाने मला एक ओळख दिली. डीजीएम म्हणून आठ वर्षे काम केल्यानंतर मी निवृत्त झालो.

**फॉरेक्स डिपार्टमेंट व ऑडिटचे अनुभव**

फॉरेक्स डिपार्टमेंटला काम करणे किंवा केलेल्या कामाचे ऑडिट करणे हे खूप आव्हानात्मक असते कारण यात compliance related issues खूप असतात. नियमांचा सतत अभ्यास असणं व सजगता खूप महत्त्वाची असते. कुठल्याही सिस्टीममध्ये मग ती सरकारी बँकिंग, कॉर्पोरेट जगत वा खुद्द सरकार असो, ऑडिट कुणालाच आवडत नाही. ऑडिटकडे दुर्लक्ष करणे, त्याचे महत्त्व कमी करणे हे अनुभवाला येते. कित्येक ठिकाणी ज्याला फार काही काम जमत नाही वा ज्यांनी फार भानगडी केल्या अशा माणसांना ऑडिटला टाकतात. ऑडिटकडे दुर्लक्ष करणे, रिपोर्ट दडवून ठेवण्याचे भयंकर परिणाम भारतीय बँकिंग क्षेत्राने बघितले आहेत.

२०१८ साली उघडकीला आलेला पंजाब नॅशनल बँकेतला नीरव मोदी व मेहुल चोक्सी यांनी केलेला १४००० कोटी रुपयांचा भ्रष्टाचार आजवरचा बँकिंगमधला सर्वात मोठा भ्रष्टाचार. हा भ्रष्टाचार २०१२ पासून सुरू होता व २०१८ साली उघडकीला आला. यावर विचार करताना अस वाटतं की आपल्या बँकिंग सिस्टीमने खालील गोष्टींवर दुर्लक्ष केले, ज्याची इतकी मोठी किंमत आपण चुकवली.

१) फॉरेक्स विभागाकडे दुर्लक्ष. तिथल्या कामाचा आवाका, तिथली आव्हानं याचा कधी अभ्यास केला गेला नाही.

२) तिथल्या माणसांचे शिक्षण, सातत्य ठेवलं गेलं नाही. तिथल्या कामाची भीती वाटून कित्येकजण तिथे काम करायला उत्सुक नसतात, यावर काही उपाय योजना झाली नाही. पीएनबीमधे स्वीफ्टवर वर्षानुवर्षं खालच्या श्रेणीचा ऑफीसर /क्लार्क की ज्याने फ्रॉड केला तो काम करत होता, की ज्याची बदली वर्षानुवर्षं झाली नाही. तो सलग सात वर्षे एकाच ठिकाणी तेच काम करत होता. बऱ्याच वेळी बऱ्याच बँकांमध्ये अशा पदावर आलेल्या अधिकाऱ्यांना या विषयाची पूर्ण जाण नसते, अभ्यास नसतो त्यामुळे ते त्यांचा पासवर्ड शेअर करतात की ज्याचा फायदा फसवणूक करणाऱ्या कंपूने घेतला.

३) पीएनबीमध्ये व इतर अनेक भारतीय बँकांमध्ये स्वीफ्ट व कोअर बँकिंग (CBS) ची इंटरफेस (हातमिळवणी) नव्हती त्यामुळे सिस्टीममधे कुठलीही एंट्री न होता, स्वीफ्टद्वारे LOU – बँक गॅरेंटी दिल्या गेल्या. नीरव मोदीच्या कंपनीला कुठलीही आर्थिक मर्यादा नव्हती व इंटरफेस नसल्यामुळे डायरेक्ट स्वीफ्टद्वारे गॅरंटी दिल्या गेल्या ज्याची नोंद झाली नाही. पीएनबीमधील भ्रष्टाचार उघडकीला आल्यावर ८०% भारतीय बँकांनी हा इंटरफेस करून घेतला. पण तो बैल गेला नी झोपा केला असा प्रकार घडला.

**आमच्या बँकेचे विलीनीकरण**

आमची युनायटेड वेस्टर्न बँक एक चांगली बँक होती. नागरिकांचा व ग्राहकांचा अतूट विश्वास व प्रेम होते. प्रतिकूल परिस्थितीत अनेक गुणांचा कस लागतो. रिझर्व्ह बँकेकडून moratarium ची घोषणा झाल्यावर याचा प्रत्यय आला. आमच्या बँकेची आर्थिक पत्रके (Balance sheet) इतकी चांगली नव्हती. पण अनेक मोठ्या राष्ट्रीयकृत बँकांचीही हीच किंवा याहूनही वाईट स्थिती होती पण सरकार त्यांच्यामागे उभे राहिले, दुर्दैवाने आमच्या मागे तसे कुणी उभे राहिले नाही. आमच्या संस्थेत कोणताही भ्रष्टाचार नव्हता, समाजात पत उत्तम होती त्यामुळे विक्री करण्याच्या (लिलावाच्या) वेळीस २१ आर्थिक संस्था व अन्य बँकांनी बोली लावली. दहा रुपयाच्या शेअर्सचे मूल्य २१ रुपये ठरवून त्याप्रमाणे जुन्या भागधारकांना पैसे मिळाले. अशा बँकेला failed bank म्हणणे चुकीचे आहे. फार-फार तर 'अडचणीत आहे, समस्याग्रस्त आहे' असे म्हणणे संयुक्तिक ठरले असते कारण त्यावेळेस व आजही अनेक छोट्या-मोठ्या बँका अडचणीमध्ये आहेतच. If you want to shoot a dog, call it mad असा काहीसा प्रकार आमच्या बँकेच्या बाबतीत झाला. (आमच्या बँकेच्या विक्री -take over बद्दल नंतर काही पुस्तकेही लिहिली गेली आहेत.)

**विकसता विकसता विकसावे!**

निवृत्त होण्यापूर्वीची तीन वर्षं नोकरीत आव्हानात्मक होती. एका नामांकित दुष्ट माणसाची नेमणूक मुद्दाम माझ्या हाताखाली केली होती. या माणसाची वागण्याची एक विशिष्ट तऱ्हा होती. तो त्याची nuisance value दाखवून त्याच्या वरिष्ठांना त्रास देऊन घाबरवायचा, जेरीस आणायचा. मला एका गंभीर प्रकरणात तो सापडला. वरिष्ठांनी आणि अनेकांनी सल्ला दिला की याच्या नादाला लागू नकोस, दुर्लक्ष कर, तडजोड कर. सगळीकडच्या व्यवस्थापनाची एकच वृत्ती अशी असते की त्यांना सत्य-असत्याची लढाई शेवटपर्यंत नेण्यापेक्षा प्रासंगिक हित व तडजोडी महत्त्वाच्या असतात. त्यामुळे कुठूनही पाठिंबा नव्हता. अशावेळी न घाबरता कोणालाही भिडायचे, सत्यासाठी लढायचे हे प्रबोधिनीत शिकलेले संस्कार शेवटी कामी आले. या लढाईत मला देखील त्रास झाला पण 'नमविता नमविता नमवावे' या शिकवणीने बळ दिले व यशही मिळाले!

मातृभाषेतून मराठीतून सही करण्याचा प्रबोधिनीचा संस्कार आयुष्यभर पाळला. हा वेगळेपणा सर्व ठिकाणी जाणवत होता. नोकरीनिमित्त विविध शहरात वास्तव्य झाले. प्रबोधिनीत असताना साम्यवाद अभ्यास, हिंदुत्व या शिबिरातून याचा अभ्यास व विविध बाजूंनी वैचारिक जडणघडण झाली. पाणी प्रश्नावर अभ्यास केलेले श्री. राजेंद्रसिंह राणा यांना प्रबोधिनीच्या वैचारिक बैठकीत १९७५च्या आसपास बोलताना ऐकलं होतं. त्यांच्या बोलण्याचा प्रभाव पडला होता. पुढील लढाया पाण्यावरून होतील हे त्यांच्यामुळे खूप वर्षांपूर्वी समजलं होतं. अशा प्रकारे विविध विषयांचा अभ्यास प्रबोधिनीत होत होता. त्यामुळे भारतात कोणाशीही बोलताना अभ्यासपूर्ण वादविवाद करता आला. आपल्या वैयक्तिक आयुष्या पलीकडे आपण समाजाचे देणे लागतो हे संस्कार कायमच राहिले!

मा. आप्पा एक मोठे visionary होते. त्यांना पूर्ण परिस्थितीचं आकलन होतं. त्यामुळे एकाच वेळेला युवक संघटन, ग्रामविकास, उद्योगधंदे, त्यामधून संस्थेला लागणारे पैसे कसे उभे करायचे आणि जीवनाच्या वेगवेगळ्या क्षेत्रात म्हणजे अगदी धर्मापासून ते विज्ञानापर्यंत प्रत्येक गोष्टीमध्ये काम करायची त्यांची जबरदस्त इच्छा होती. तो स्पेक्ट्रम इतका मोठा होता की बहुसंख्य लोक त्या स्पेक्ट्रमने भारावले होते. पण प्रबोधिनीच्या बाहेर पडल्यानंतर हे जाणवले की ज्याप्रमाणे प्रबोधिनीमध्ये मोठी माणसं भेटली तशीच मोठी माणसं बाहेर देखील आहेत. ती माणसे प्रबोधिनीचे संस्कार न घेता सुद्धा चांगल्या वागणुकीची आणि संस्कारांची होती. अनेक लोकांनी आपला गोष्टीमध्ये ज्याचा उल्लेख केला तो मुद्दा म्हणजे प्रबोधिनी एक छोटेसे जग होते आणि त्या जगाच्या बाहेर काय सुरू आहे हे कधी-कधी आपल्या लक्षात यायचे नाही. प्रबोधिनी सोडून समाजात गेल्यानंतर ते लक्षात आले. कदाचित हा थोडा विरोधाभास वाटेल की प्रबोधिनी सर्व कामे समाजाच्या विकासासाठीच करते आणि वेगवेगळ्या समस्या सोडवण्यासाठी प्रबोधिनीचे कार्यकर्ते समाजामध्ये उतरून काम करत होते पण तरीदेखील प्रबोधिनीमध्ये परत आलो की आपल्याच कोशामध्ये जात होतो.

बँकिंग क्षेत्रामध्ये येणाऱ्या प्रबोधकांनी समाजातील शेवटच्या व्यक्तीपर्यंत पैसा चांगल्या अर्थाने पोचला पाहिजे हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवले पाहिजे. दोन वर्षं माझे पोस्टिंग औरंगाबादला होते. त्या पोस्टिंगमध्ये काही विशिष्ट समाजगटासाठी असणाऱ्या

योजनांचा भरपूर प्रमाणात गैरवापर केल्याचे मला आढळले. त्यांचे नेते म्हणजे हातामध्ये सोन्याचे कडे आणि गळ्यामध्ये सोन्याच्या माळा घातलेले! त्यांची मांडणी उत्तम असायची. ते येऊन म्हणायचे की, तुम्हाला मोठ्या-मोठ्या उद्योगपतींनी फसवलेले चालते पण आमच्या सारख्या सामान्य लोकांनी कर्ज थकवले तर तुम्हाला चालत नाही, हे असे कसे चालणार? असे सर्व प्रकार घडायचे. पैसा विधायक मार्गाने तळागाळातील लोकांपर्यंत कसा जाईल हे बघण्याची जबाबदारी प्रबोधिनी मधून बाहेर पडणाऱ्या आणि बँकिंग क्षेत्रात येणाऱ्या प्रबोधकांची आहे असे मला वाटते. राजीव गांधी स्वतः म्हणाले होते रुपया मधले फक्त वीस पैसे खालपर्यंत जातात आणि ८० पैसे मधल्या व्यवस्थेमध्ये वाटले जातात. त्यामध्ये अजूनही फारशी सुधारणा झालेली नाही. ही सुधारणा व्हायला हवी. खऱ्या अर्थाने पैसा समाजातील शेवटच्या स्तरापर्यंत जायचा असेल तर हा बदल व्हायला हवा. हिवरे बाजार, राळेगणसिद्धी अशा स्वरूपाची जलसंधारणाची आणि अन्य स्वरूपाची विधायक कामे होत असतील तर त्यामध्ये तुम्ही सक्रिय सहभाग घ्यायला हवा. स्वतःच्या कामाच्या पलीकडे जाऊन तुम्ही काम केले पाहिजे. प्रबोधिनीत संस्कारित झालेल्या विद्यार्थ्यांना अशा कामांसाठी काय करावे लागते हे इतरांपेक्षा लवकर लक्षात येते. हे काम बँकिंग क्षेत्राचा वापर करून अधिक चांगले करण्यासाठी बँकिंग क्षेत्राच्या ज्ञानाचा वापर करता यायला हवा. गेल्या काही वर्षांत बँकिंग क्षेत्रामध्ये सकारात्मक बदल होत आहेत. प्रत्यक्षात बँक लोकांकडे जाऊन सरकारने दिलेल्या उद्दिष्टांसाठी सामान्य माणसांची खाती सुरू करते आहे हे महत्त्वाचे आहे!

समाजामधील घटकांची देखील 'बँकेकडून घेतलेले कर्ज म्हणजे ते बुडवायचे आणि ते बुडवले तरी फारसे बिघडत नाही' अशी झालेली मानसिकता बदलायला लागेल! ही मानसिकता केवळ छोट्या किंवा मोठ्या व्यक्तिंपुरती मर्यादित नसून सर्व समाजामध्ये आहे. अनेक मोठ्या कंपन्या बुडतात त्यामध्ये अनेक धनाढ्य व्यक्तिंचा समावेश असतो. एक वेळ मध्यमवर्गीय आणि सामान्य माणूस बँकेचे पैसे वेळेवर परत करेल पण सर्व कायदेशीर बाबींचा फायदा घेऊन बँकांना कसं फसवता येईल हे पाहणारा एक मोठा गट आहे. आपण पैसे घेतले आहेत तर ते परत देणे ही आपली जबाबदारी आहे ही जाणीव वाढवायला लागेल.

तीस वर्षांपूर्वी मी गाडगे महाराजांचे चरित्र वाचले आणि त्याचा माझ्यावर फार मोठा प्रभाव पडला. माझ्या दृष्टीने आधुनिक काळातील सर्वात मोठे संत ज्यांना म्हणता येईल ते म्हणजे गाडगेबाबा! ते स्वतः निरक्षर होते पण त्यांनी लोकांच्या शिक्षणासाठी आयुष्यभर काम केले. कष्ट करणे आणि स्वच्छता हे संस्कार त्यांनी सतत लोकांवर केले. लग्न करताना प्रचंड पैसा खर्च करणे, त्यासाठी कर्ज काढणे, पशुबळी, दारू पिणे अशा वाईट चालीरीती बंद करण्यासाठी त्यांनी प्रबोधन केले. स्वतःच्या मुलीचे लग्न मटण न शिजवता आणि दारूचा वापर न करता केले. असे सर्व विधायक बदल करताना हिंदू धर्म खोटा आहे, बंडल आहे असे कधीही ते म्हणाले नाहीत. धर्माची तोडफोड न करता त्यातील वैगुण्य दूर करून लोकांना शिक्षित करणे हे फार मोठे काम आहे! किंबहुना त्यांनी प्रत्येक वेळेला मंदिरातच उभे राहून कीर्तन करत हे सर्व धडे समाजाला दिले. 'देव दगडामध्ये नाही तर तो माणसांमध्ये आहे. तुम्ही माणसामधला देव पहा.' अशी शिकवण दिली. गाडगे महाराज यांच्या घरी खूप गरिबी होती. त्यांना त्यावेळी काम केल्याबद्दल एक रुपया मिळाला होता. त्यांनी तो स्वतःच्या धोतराला बांधून ठेवला ते आंघोळीला पाण्यात उतरले असताना तो रुपया कुठेतरी पडला आणि हरवला. तो शोधण्याचा प्रयत्न करत असताना महाराजांना अचानक जाणवले की रुपया गेल्याचे आपण इतकं दुःख करत बसलो आहे पण संपूर्ण जीवन वाया जात आहे याकडे आपण आत्तापर्यंत लक्ष दिले नाही. हा त्यांच्या आयुष्यातील टर्निंग पॉइंट होता. त्यांच्या चरित्राचा माझ्यावर गेली काही वर्षे खूप मोठा प्रभाव आहे.

निवृत्तीनंतर आधी शिकलेल्या गोष्टी म्हणजे रेकी, ध्यान, alternative medicine याचा अभ्यास व प्रयोग मी सुरू केला. मुद्राशास्त्राबद्दल मी खूप वर्षांपूर्वी वाचन केले होते. दररोजच्या चालण्याच्या व्यायामाला मी मुद्रांची जोड देतो. Pyramid ध्यानपद्धती, magneto therapy यातही मला रुची आहे. बँकेतील जुन्या मित्रांसमवेत दर शनिवारी ट्रेक, त्यातून भ्रमंती व गप्पा असाही कार्यक्रम असतो.

**असती का ऐसे कुणी?**


आमच्या वर्गामध्ये पंधरा-सतरा जण होते. त्यापैकी तिघा-चौघांचे असे ग्रुप जवळून कनेक्टेड आहेत. वर्गाचे देखील चांगले कनेक्शन आहे. आजही आमच्या गाठीभेटी होतात. सर्वांनाच प्रबोधिनीबद्दल सारखीच आत्मीयता असेल असे नाही


पण वर्गामध्ये सगळ्यांचे चांगले संबंध आहेत. प्रबोधिनीच्या माजी विद्यार्थी मेळाव्याचा जुन्या नात्यांना उजाळा देण्यासाठी खूप चांगला उपयोग झाला. जेपीपी फाऊंडेशन आणि विशेष उद्दिष्ट गटांमुळे देखील उत्तम संधी उपलब्ध झालेल्या आहेत. माझा स्वतःचा अनुभव असा आहे की जेपीपी फाऊंडेशनमध्ये काही अडचण घेऊन गेलो तर त्यावर लगेच समाधानकारक उत्तर मिळते.

खरंतर माझी गोष्ट मी 'स्वांत सुखाय' सांगत आहे असं म्हणेन. त्यामुळे मी नवीन कार्यकर्त्यांना काही सांगणे इष्ट नाही असे मला वाटते. मात्र एक गोष्ट मी आवर्जून सांगेन की नवीन कार्यकर्त्यांची आव्हाने खूप अवघड आहेत. प्रथम प्रतिज्ञित असो वा तृतीय प्रतिज्ञित समाजातील प्रलोभनांवर मात करून समर्पित वृत्तीने काम करणे हे आजच्या काळात आव्हानात्मक आहे! इंटरनेटच्या युगात घरातली माणसे एकमेकांपासून दुरावली जात असताना समाजाला जोडणे हे अवघड काम नक्कीच आहे. अमर्यादित मनोरंजनाची साधने आणि पूर्वीच्या तुलनेत आर्थिक स्वावलंबनाची कठीण आव्हाने असताना देखील तरुण वयात प्रबोधिनीसाठी काम करावेसे वाटणे हाच आत्ताच्या कार्यकर्त्यांचा चांगुलपणा आहे. भरपूर पैसा मिळवावा हे आकर्षण वाटणे साहजिक आहे तरीही समर्पित वृत्तीने काम करत राहण्याच्या आव्हानाला कसे सामोरे जायचे हे तुमचे तुम्हालाच शोधावे लागणार आहे. समाजात आपल्यापेक्षा चांगल्या आर्थिक परिस्थितीत असणाऱ्या लोकांची समाजासाठी काहीतरी द्यावे अशी इच्छा होत नाही. या पार्श्वभूमीवर मी अनेक सामाजिक संस्थांना आर्थिक मदत करून त्याद्वारे समाजासाठी खारीचा वाटा उचलण्याचा प्रयत्न करत असतो. प्रबोधिनीसारख्या संस्थेशी जोडले जाणे हा एक भाग्याचा विषय असतो. प्रत्येक यशाचे मोजमाप केवळ पैशांमध्ये करता येत नाही. मी आयुष्यामध्ये काही तरी समाजासाठी उपयुक्त काम केले ही भावना महत्त्वाची असते. हे आपल्याला प्रबोधिनीत शिकायला मिळते. ते संस्कार आपण प्रामाणिकपणे आयुष्यभर जोपासायला हवेत!

**मित्रांबरोबर भटकंती**







## RAPID FIRE

१. आवडता चित्रपट- 'आनंद' आणि 'दीवार'

२. आवडते पुस्तक - गो. नि. दांडेकर लिखित गाडगे महाराजांचे चरित्र.

३. आवडीचे ठिकाण - राजगड आणि हिमाचल प्रदेश

४. पहिली प्रतिक्रिया

- पैसा - खूप गरजेचा पण त्यामागे किती धावायचे याचे भान हवे!
- बँकिंग - समाजासाठी उपयुक्त संस्था. पण पुढील काहीच वर्षांत अधिक Disruption होईल. बँक म्हणजे मोबाइल हे समीकरण आत्ताच दिसतं आहे.
- संत साहित्य - आपल्याकडील संतांच्या अनुभूती आणि दृष्टांत यामधून समाजाचे मोठे शिक्षण झालेले आहे. सर्वसामान्य व्यक्तीपर्यंत पोचणारी ही एक अभिनव शिक्षण पद्धती आहे.
- आप्पा पेंडसे - Visionary आणि समर्पित आयुष्य!
- ज्ञान प्रबोधिनी- आयुष्यातील भाग्याची घटना म्हणजे माझा प्रबोधिनीशी संपर्क आला. प्रबोधिनी शिवाय मी कसा झालो असतो असा मी विचार करतो तेव्हा आज प्रबोधिनीने मला काय दिले हे लक्षात येते.

५. पुन्हा एकदा जर आयुष्य नव्याने जगायची संधी मिळाली तर काय व्हायला आवडेल?

- मला साहित्य क्षेत्रात काम करायला आवडेल. लेखक किंवा दिग्दर्शकाच्या कल्पक भूमिकेत काम करायला आवडेल.

**संजीव (संजय) गोखले**
**9096304273**
**goksanjeev@gmail.com**

**मुलाखत व शब्दांकन - श्रेयश फापाळे, अथर्व पाटणे संपादन - मानसी बोडस, पल्लवी गोखले - नगरकर**

**आरेखन व मांडणी - निशिगंधा खळदकर**

Write to us : jpp51_51@jnanaprabodhini.org